# "राजर्षि छत्रपती शाहू महाराजांचे कृषी, शिक्षण आणि उद्योगामधील योगदान"

**श्री. शरद वि. पाटील, संशोधक विद्यार्थी,राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर**
**प्रा. डॉ. अण्णासाहेब हरदारे, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज**

---

**प्रस्तावना -**

"कसब, गुण कतृत्व याविषयी शाहू महाराजांना अतिशय आस्था होती आणि समाजातल्या रंजल्या-गांजल्याबद्दल कणव होती. त्यांचे शरीर जसे अवाढव्य होते. तसेच त्यांचे मतही होते. त्यामुळे समाजातील गुणी, कर्तृत्ववान यांना महाराजांचा आधार होता. त्याचप्रमाणे लहानशा खेडयातील लहानशा माणसालाही आधार होता. सत्ताधारी हा असा असावा लागतो. गांजलेल्यांना पिडीतांना तो अपील कोर्टासारखा वाटावा आणि कर्तृत्ववानांना त्याचा आधार वाटावा शाहू महाराज तसे होते आणि म्हणून ते एक केंद्रबिंदू बनले होते. लोह चुंबकाकडे लोखंडाचे कण धाव घेतात, त्याचप्रमाणे लोक त्यांच्याकडे धाव घेत. "राजर्षि महाराज हे केवळ वारसा हक्काने राजे नव्हते. तर ते लोकांचे राजे होते."

- महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात आपल्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक कार्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करुन त्यांच्या सर्वांगीण क्षेत्रात प्रगती घडवून आणणारे प्रजाहितदक्ष सत्ताधीश म्हणजे राजर्षि शाहू महाराज होय, विचारपूर्वक स्वीकारलेल्या सामाजिक किंवा राजकीय तत्वांच्या बाबतीत कोणतीही तडजोड न स्वीकारता, या तत्वांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेले असामान्य मानसिक स्थैर्य छत्रपती शाहू महाराजांजवळ होते. त्यांच्या कार्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व केवळ कोल्हापूर संस्थानापुरतेच मर्यादित न राहता, अखिल महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातही लोकप्रिय झाले. आधुनिक काळात महाराष्ट्रात झालेल्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक सुधारणांचा इतिहास पाहताना राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याची माहिती घेणे अपरिहार्य ठरते तेव्हा प्रस्तुत शोध निबंधासाठी छ. शाहू महाराजांच्या कृषी, शिक्षण आणि उद्योगातील योगदानावर विचार मंथन करण्यात येणार आहे.

छत्रपती शाहू महाराज हे जन्मत: राजघराण्यातील नव्हते, ते कागलच्या घाटगे घराण्यातील होते. त्यांचा जन्म **26** जुलै, **1874** रोजी झाला. त्यांच्या पित्याचे व मातेचे नाव अनुक्रमे श्रीमंत जयसिंगराव ऊर्फ आबासाहेब घाटगे, श्रीमंत राधासाहेब असे होते. शाहू महाराजांचे मुळ नांव यशवंतराव होते. सन **1708** मध्ये कोल्हापूरचे स्वतंत्र राज्य स्थापन झाले. त्यानंतर या सत्तेवर छत्रपती दुसरा शिवाजी, छत्रपती संभाजी, छत्रपती तिसरे शिवाजी, छत्रपती आबासाहेब महाराज, छत्रपती बुवासाहेब महाराज, छत्रपती बाबासाहेब महाराज, छत्रपती राजाराम महाराज व छत्रपती चौथे शिवाजी हे सत्ताधीश बनले. पण अहमदनगरच्या किल्ल्यात सन **1983** मध्ये निपुत्रिक अवस्थेतच त्यांचा मृत्यू झाला. कोल्हापूर संस्थानचा कारभार चालविण्यासाठी दत्तक घेण्याची गरज निर्माण झाली. त्या दृष्टीने हालचालींना सुरुवात झाली. कागलच्या घाटगे घराण्यातील आबासाहेब घाटगे यांचा ज्येष्ठ पुत्र यशवंतराव याला दत्तक घेण्याचे ठरवले. आणि **17** मार्च **1884** रोजी दत्तकविधान झाले. दत्तक विधानानंतर यशवंतराव हे शाहू महाराज म्हणून ओळखले गेले व कोल्हापूर संस्थानचे ते वारसदार बनले. राजकोट, धारवाड येथे शिक्षण पूर्ण झाल्यावर वयाच्या विसाव्या वर्षी **2** एप्रिल **1894** रोजी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभाराची सुत्रे आपल्या हाती घेतली. प्रजाजनांना जाहीर केले की, "आमचे प्रजानन सदासुखी व संतुष्ट असावेत.

त्यांच्या हिताची एकसारखी अभिवृत्ती घेत जावी व आमच्या संस्थानचा सर्व बाजूंनी अभ्युदय व्हावा, अशी आमची इच्छा आहे. यासाठी सर्वांच्या उज्वल राजनिष्ठेची व सहकार्याची आम्हाला आवश्यकता आहे." या घोषणेवरुनच महाराजांची प्रजाजनांना कळकळ व कार्ये करण्याविषयी त्यांची इच्छा स्पष्ट होते. या इच्छेतूनच महाराजांनी आपल्या संस्थानात कृषी, शिक्षण आणि उद्योग क्षेत्रात महत्वपूर्ण असे आपले योगदान दिले आहे.

आपल्या संस्थानातील बहुजन समाजाची सर्वांगीण प्रगती करायची असेल तर शैक्षणिक, कृषी आणि उद्योग क्षेत्रातील कार्याला अतिशय महत्वाचे स्थान दिले प्रामुख्याने छत्रपती शाहू महाराजांनी समाज्याची प्रगती होण्यासाठी आणि शाश्वत पाण्याचा पर्याय निर्माण होण्यासाठी महाराणी लक्ष्मीबाई तलाव निर्माण केला. शिक्षणासाठी वेगवेगळया शिक्षण संस्था काढल्या, प्राथमिक शिक्षण आपल्या संस्थानात सक्तीचे केले. वसतिगृह काढली. उद्योग धंदयाच्या पिकासाठी शाहूपुरी या व्यापारपेठेची स्थापना करुन **1906** मध्ये छत्रपती स्पिनिंग आणि विव्हींग मिलचा पाया घातला. आर्थिक क्षेत्रात विकसित झालेला समाज स्वबळावर उभा राहू शकेल. असा त्यांचा विश्वास होता. म्हणूनच शिक्षण, शेती, व्यापार व उद्योगधंदा यासाठी त्यांनी प्रोत्साहन दिले.

**संशोधन पेपरची उदिदष्टये -**

**1.** छ. शाहू महाराजांचे कृषी क्षेत्रातील योगदान
**2.** छ. शाहू महाराजांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान
**3.** छ. शाहू महाराजांचे उद्योग क्षेत्रातील योगदान

**संशोधन पध्दती -**

सदर शोध निबंधाच्या लेखनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे.

**संशोधन स्त्रोत -**

सदर शोधनिबंधाच्या लेखनासाठी दुय्यम साधन सामुग्रीचा उपयोग करण्यात आला असून यातील मासिकांचा योग्य प्रमाणात उपयोग करण्यात आला आहे.

**आशय विश्लेषण -**

छत्रपती शाहू महाराजांच्या अधिकार ग्रहण केल्यानंतरच स्पष्ट झलेले की महाराजांना आपल्या प्रजाजनांना सर्व क्षेत्रात सहकार्य करुन आपल्या संस्थानातील आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक दर्जा उंचवायचा किंबहूना संस्थानातील सर्वांगीण प्रगती करायची या उद्देशाने कृषी, शैक्षणिक, आणि उद्योग क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केले आहे. त्याचा आढावा खालीलप्रमाणे **-**

अ) **छ. शाहू महाराजांचे कृषी क्षेत्रातील योगदान -**

आज महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्हा शेती, उद्योगधंदे व सहकार या तिन्ही क्षेत्रात अग्रेसर आहे. तथापि या प्रगतीचा प्रारंभ स्वातंत्रोत्तर काळातील नाही तर स्वातंत्र्यपूर्व काळात शाहू महाराजांच्या कारकिर्दीत या प्रगतीची पायाभरणी झाली होती. त्याच काळात कोल्हापूर संस्थानात सुरु झालेली हरितक्रांती ही महाराष्ट्रातील पहिली हरित क्रांती होती. त्या क्रांतीचे जनकत्व महाराजांच्या दूरदृष्टीकडे व कल्याणकारी पुरोगामी धोरणाकडे जाते. राज्यारोहणानंतरच्या आपल्या कारकिर्दीच्या पहिल्या पर्वातच शाहू महाराजांना दुष्काळासारख्या संकटाखाली आपली रयत भरडली जात असल्याचा कडू अनुभव घ्यावा लागला. आणि यावर कायमची उपाययोजना करण्याचे मनावर घेऊन **1902** साली त्यांनी आपल्या संस्थानासाठी अपूर्व असे "सार्वत्रिक पाटबंधारे धोरण" **(Mass**

**Irrigation Policy)** जाहीर केले. त्यासाठी स्वतंत्र पाटबंधारे खाते निर्माण करुन त्याच्यावर "इरिगेशन ऑफिसर"ची नेमणूक केली. आणि या मार्फत संस्थानातील पाटबंधा-याची तपशीलवार पाहणी करण्यात आली. नव्या, जुन्या विहीरी, छोटे मोठे तलाव, बंधारे यांच्या योजना तातडीने अंमलात आणल्या जाऊ लागल्या. सहयाद्रीच्या घाटात भोगावती नदीचा जलप्रवाह अडविणा-या धरणाची महत्वाकांक्षी योजना आखली आणि यातून राधानगरी धरणाची निर्मिती झाली.

राधानगरी धरणाचे **1909** साली प्रत्यक्ष बांधकाम सुरु झाले. **1918** सालापर्यंत **14** लाख रुपयांची रक्कम खर्ची पडून धरणाचे **40** फूटापर्यंत बांधकाम पूर्ण झाले आणि पावसाळयात साठलेल्या पाण्यातून **600** दशलक्ष घनफूट पाणी शेतीसाठी उपलब्ध होऊ लागले. भोगावती पंचगंगा नदीकाळ बारमास हिरवीगार शेती फूलू लागली. महाराजांचे हरित क्रांतीचे स्वप्न अंशत: का होईना साकार झाले. पुढे बराच काळ धरणाचे बांधकाम चालूच होते. शेवटी ते **1957** साली पूर्णत्वास गेले. शेतीसाठी शाश्वत पाणी देण्याचा महाराजांचा प्रयत्न यशस्वी झाला. आता शेतीमध्ये बारमाही पिके घेण्यात येऊ लागली. पण महाराजांच्या मनात युरोप मधील शास्त्रीय शेतीचा प्रयोग आपल्या संस्थानात करण्याची इच्छा होती. त्या अनुषंगाने संस्थानात सुधारित शेतीपध्दतीचा प्रसार करण्यासाठी **1912** साली कोल्हापूरात फिंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिटयुटची स्थापना केली. तिला जोडूनच आधुनिक शेती अवजारांचे एक म्युझियम सुरु करण्यात आले. शेतक-यासाठी सुधारित अवजारे, बी-बियाणे खते आणि आधुनिक मशागतीच्या पध्दती यांचे ज्ञान व प्रशिक्षण देण्यासाठी खास शेती अधिका-याची नेमणूक करण्यात आली.

शेतक-याला जास्तीत जास्त उत्पादन काढण्याची इच्छा जागृत होण्यासाठी यात्रा, उत्सव या ठिकाणी शेतकी प्रदर्शने भरवली जाऊ लागली. यातून शेतक-याच्या चांगल्या मालाला बक्षीस देण्यात येऊ लागले. महाराज शेतीबरोबर शेतीस जोडधंदा म्हणून दुध व्यवसाय बाबत सुध्दा कार्ये केली. यामध्ये ज्यांनी उत्तम पैदाशाच्या जनावरांचे प्रदर्शन भरवले जाई. याचबरोबर विज्ञानाची गोडी निर्माण होण्यासाठी विज्ञान प्रदर्शन ही आयोजित केले जाई.

प्रयोगशीलता ही आधुनिकतेचा एक महत्वाचा पैलू असतो. संस्थानात ऊस, भात, ज्वारी, भुईमुग, कडधान्ये ही नेहमी पिके काढली जात आहे. पण या शिवाय महाराजांनी सहयाद्रीच्या रांगात उतार जमिनीवर त्यांनी चहा, कॉफी, रबर यांचे मळे तयार केले. यापैकी चहाच्या मळयांचा प्रयोग अपेक्षेहून यशस्वी झाला. उत्कृष्ट दर्जाचा चहा कोल्हापूर संस्थानात उत्पादित होऊ लागला. लवकरच व्यापारी तत्वावर चहाचे उत्पादन सुरु झाले. "Panhala Tea No. 4" या नावाने तो संस्थानबाहेर पाठवला जाऊ लागला. पण नंतरच्या काळात चहाच्या शेतीकडे फारसे कोणी गांभीर्याने पाहिले नाही. दुर्दैवाने कोल्हापूरच्या "पन्हाळा चहा" चे कालौघात इतिहास जमा झाला.

थोडक्यात शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात जनतेच्या शाश्वत विकासासाठी शेती आणि शेतीवर आधारित ज्या अडचणी होत्या त्याबाबत शाश्वत कार्ये केली आहे यातून महाराजांची आधुनिक दृष्टिकोन पहावयास मिळते. त्यांच्या कृषी धोरणाची माहिती मिळते. महाराजांचे वैज्ञानिक दृष्टिकोन, प्रयोगशीलता, आधुनिकता हे दृष्टिकोन पहावयास मिळतात.

ब) **छ. शाहू महाराजांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान -**

छत्रपती शाहू महाराजांच्या एकूण कार्यात त्यांचे शैक्षणिक कार्ये अतिशय महत्वाचे आहे. शिक्षणाची महती सांगताना महाराज म्हणतात, "शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे, असे माझेच ठाम मत आहे." शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास

सांगतो. अज्ञात बुडून गेलेल्या देशात, उत्तम मुत्सदी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानाला अत्यंत आवश्यकता आहे. बहुजन समाजाचा शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी महाराजांनी योजनाबध्द आखणी केलेली दिसते. प्राथमिक शिक्षणाचा पाया दृढ केल्यानंतर उच्च् शिक्षणापर्यंत वाटचाल करण्याचा त्यांचा निश्चय होता.

वरिष्ठ वर्गाने घातलेली विदयाबंदीची बेडी तोडण्याचे पहिले प्रयत्न ब्रिटीशांनी केले. इ.स. **1854** सालीच शिक्षणाची दारे सर्व लोकांना खुली करत असता त्यांनी जाहीर केले होते. मिशन-यांच्या शाळात स्पृश्यास्पृश्य हा भेदभाव मानला जात नव्हता हे खरे, पण या शाळात वरिष्ठ वर्गाचे पालक व मुले अस्पृश्य मुलांना येऊ देत नव्हती. या वरती उपाय म्हणून महाराजांनी आपल्या संस्थानात मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा करावा या विषयी महाराजांनी **1912-13** सालापासून गांभीर्याने विचार करत होते. पुढे त्यांनी शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसारासाठी “वतनी शिक्षका” सारखे काही अभिनव प्रयोगही केले, पण ते फार यशस्वी झाले नाही. **1917** साली मात्र या बाबत निश्चित पाऊल उचलले. **24** जुलै रोजी महाराजांनी जाहीर केले, “येत्या गणेश चतुर्थीपासून **(30** सप्टेंबर**)** करवीर इलाख्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचे आहे. सध्या असलेल्या सर्व प्राथमिक शाळांतील फी सदर दिवसापासून माफ करण्यात येत आहे.” तसेच या सक्तीच्या शिक्षणावर **1** लाख रुपये खर्च करण्याचे जाहीर केले. त्यापैकी **80** हजार दरबार खजिन्यातून तर **20** हजार देवस्थान फंडातून या रकमेतून शिल्लक राहणारी रक्कम, ट्रेनिंग कॉलेज, शाळांच्या इमारती, शिक्षणोपयोगी साहित्य यावर खर्च होणार होती आणि लवकरच **21** सप्टेंबर **1917** रोजी, “सक्तीच्या शिक्षणाचा कायदा” प्रसिध्द करण्यात आला. यामध्ये महाराजांनी शिक्षण घेण्याची सक्ती केलीच पण या बरोबर मुले शाळेत पाठविण्यासाठी आई-वडिलांच्यापण सक्ती करण्यात आली. या कायदयाची अंमलबजावणी कसोशीने केली गेली. साधारपणे **50** ते **1000** लोकसंख्या असलेल्या प्रत्येक गावात, प्राथमिक शाळा सुरु केली. वर्षभरात संस्थानांतील खेडयापाडयात **96** नव्या शाळा सुरु झाल्या, अशा पहिल्या नव्या सक्तीच्या शाळेचा उद्घाटन सोहळा, चिखली गावी खुद्द शाहू महाराजांच्या हस्ते संपन्न झाला. **(4** मार्च **1918)**

शाहू महाराज, प्राथमिक शिक्षणावर एक लाख रुपये खर्च करत होते. पुढे ही रक्कम तीन लाखांवर गेली. ही रक्कम त्या काळात महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात व विंध्य इतक्या अफाट प्रदेशांवर पसरलेल्या आख्ख्या मुंबई इलाख्याच्या तिप्पट होती. याचबरोबर समाजात जी इनामदार, सरंजामदार यासारख्या बडी मंडळी होती. त्यांच्या उत्पन्नावर शे. **10** ते **20** टक्के “शिक्षणपट्टी” बसविली गेली. अशा प्रकारे प्राथमिक शिक्षणास भक्कम आर्थिक पाठबळ देण्यात आले. प्रजेच्या उध्दाराची तळमळ असेल, तर राज्यकर्त्याला पैसा कमी पडत नाही, हे महाराजांनी आपल्या कृतीने सिध्द केले होते.

**1917-18** सालात सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना कार्यान्वित झाली, त्यावेळी या योजनेखाली **27** शाळा व **1296** मुले होती. पाच वर्षाच्या कालावधीत, **1921-22** पर्यंत वाढ होऊन शाळांची संख्या **420** व मुलांची संख्या **22007** पर्यंत पोहोचली. महाराजांनी प्राथमिक शिक्षण बाबत आपल्या संस्थानात भक्कम असे कार्य केले. महाराज एवढयावर थांबले नाहीत तर त्यांनी स्त्री शिक्षण, उच्च व व्यवसाय शिक्षणावर आपले लक्ष केंद्रित केले. कोल्हापूर संस्थानाचा स्त्री-शिक्षणविषयक दृष्टिकोन मुळातच पुरोगामी स्वरुपाचा होता. विशेषत: महाराजांच्या कारकिर्दीच्या पहिल्या **4** ते **5** वर्षात भुदरगड सारख्या मागासलेल्या भागात मुलांच्या शाळा स्थापन केल्या.

मुलींच्या शिक्षणात शिक्षकांनी अधिक लक्ष देण्यासाठी मुलींच्या शाळेत पास होणा-या मुलींच्या संस्थेवर शिक्षकांना इनाम देण्यात आले. 1919 मध्ये एक खास हुकूम गॅझेट करुन मुलींच्या राहण्या-जेवण्याची सर्व व्यवस्था दरबारकडून मोफत केली तसेच खास शिष्यवृत्या ठेवल्या. राजकन्या आक्कासाहेब यांच्या विवाहाप्रित्यर्थ प्रत्येकी 40 रु अशा एकूण 5 शिष्यवृत्या, 3, 4 थीच्या वार्षिक परिक्षेत सर्वाधिक गुण मिळवणा-या विदयार्थ्यांना देण्यात येत होत्या. मुलींच्या उच्च शिक्षणही महाराजांनी मोफत केले. रखमाबाईच्या कन्या कृष्णाबाईंना वैदयकीय शिक्षणासाठी मुंबईला पाठवले व डॉक्टर बनवले आणि एडवर्ड मेमोरियल हॉस्पीटल मध्ये वरिष्ठ वैदयकीय अधिकारी म्हणून नियुक्त केले नंतर त्यांना इंग्लंडला उच्च वैदयकीय शिक्षणासाठी पाठविले. परदेशात वैदयकिय शिक्षण घेऊन मायदेशी परतणा-या कृष्णाबाई या दुस-या महाराष्ट्र कन्या होत्या.

दक्षिण महाराष्ट्रातील उच्चशिक्षण देणारी प्रमुख् संस्था राजाराम कॉलेज अस्तित्वात आल्यामुळे ब्राम्हणोत्तर समाजातील मुलांचा उच्च शिक्षणाचा प्रश्न मिटला या कॉलेजसाठी महाराजांनी दरवर्षी 20 हजार अनुदान दरबारकडून दिले तसेच मुंबई विदयापीठाकडून फर्स्ट ग्रेड कॉलेजचा दर्जा प्राप्त करण्यामध्ये प्रयत्न केले. तसेच बाहेरील विदयार्थ्यांसाठी व्हिक्टोरिया मराठा बोर्डींग (1901), मुस्लीम बोर्डींग (1906) मिस क्लार्क होस्टेल (1908), प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डींग (1920) इ. विविध जाती धर्मातील विदयार्थ्यांच्यासाठी वस्तीगृह निर्माण केली. अशा प्रकारे कोल्हापूर संस्थानातील शिक्षणाच्याबाबत ज्या अडचणी येतील त्यावरती ठोस उपाययोजना महाराजांनी आपल्या कार्यातून केल्या आहेत. अशा प्रकारे बहुमोल शाश्वत योगदान शिक्षण क्षेत्रात दिले आहे.

क) **छ. शाहू महाराजांचे उदयोग क्षेत्रातील योगदान -**

महाराजांनी कृषी, शिक्षण क्षेत्रात उत्तम प्रगती करत असल्याने आणि या संस्थानातील उदयोग व्यवसाय क्षेत्राला चालना व प्रगती ही नियोजनबध्द असायला हवी, असे महाराजांना वाटत होते म्हणूनच तयांनी आपल्या संस्थानात, औदयोगीक सर्वेक्षण करुन उपलबध साधन संपत्तीच्या जोरावर त्यांनी मोठया कल्पकतेने स्वत: अनेक नवे उदयोग सुरु केले. काही लोकांनी सुरु करण्यासाठी प्रोत्साहन व चालना दिली. त्यानुसार 1905 पर्यंत, कोल्हापूर संस्थानात सुगंधीत औषधी तेल उदयोग, मधुमक्षिकापालन उदयोग, काठार्क उदयोग आणि सुनी कापड उदयोग सुरु केले गेले.

सुगंधी औषधी तेल उदयोग व काष्टार्क तेल उदयोग या क्षेत्रात प्रायोगिक तत्वावर काही वनौषधी तेलांचे उत्पादन सुरु केले.मुंबईत भरलेल्या औदयोगिक प्रदर्शनात कोल्हापूर संस्थानात उत्पादित झालेल्या अशा प्रकारच्या तीन सुगंधीत औषधी तेलांचे नमुने पाठविण्यात आले. यास संस्थानात चांदीचे पदक मिळाले. कोल्हापूरातील तेल प्रशंसेस पात्र ठरले. कोल्हापूर संस्थानातील मधुमक्षिकापालन या सर्वात कौतुकास्पद असा उपक्रम ठरला. त्यामध्ये महाराजांची कल्पकता, प्रयोगशीलता, दूरदृष्टी, चिकाटी इ. अनेक गुणांचे दर्शन होते. शेतक-यास हा जोडधंदा म्हणून उपयोगात येईल म्हणून हा उदयोगाविषय शास्त्रीय माहिती कुठे मिळेल या बाबत चौकशी केली असता संपूर्ण मुंबई इलाख्यात कुठेच या बाबत माहिती नव्हती. कलकत्याला डायरेक्ट ऑफ ॲग्रीकल्चरकडे चिटणीस नावाच्या माणसाला पाठवले पण तिथे सुध्दा निराशा हाती आली. संबंध हिंदुस्थानात कुठेच हा उदयोग व्यापारी तत्त्वावर केला जात नाही. तसेच त्याविषयी काहीच माहिती नाही म्हणून महाराजांनी युरोपियन मित्रांशीही पत्रव्यवहार केला पण त्यांच्या हाती काहीच लागले

नाही. तथापि त्यांनी हार मानली नाही. या विषयावरील ग्रंथ मागवून अधिका-यांना दिले. अभ्यास करायला लावला शेवटी प्रयोग करुन हाती यश आले असा प्रकारे उदयोगाची जननी म्हणून कोल्हापूरास लौकिक मिळवून दिला.

**1906** साली "कोल्हापुरात शाहू छत्रपती मिल्स" या कापड गिरणीची स्थापना करण्यात आली. कोल्हापूर संस्थानचा हा उदयोग क्षेत्रातील सर्वात मोठा प्रकल्प होता. या गिरणीच्या उभारणीसाठी विस्तीर्ण जागा, शेजारचे पाण्याचे तळे आणि **50** हजार रुपयांचे भांडवल महाराजांनी दिले. दरम्यानच्या काळात संस्थानात शिरोळ, इचलकरंजी, गडहिंग्लज इ. ठिकाणी अनेक स्पिनींग फॅक्टरीज स्थापन झाल्या. **1912-13** च्या सुमारास, संस्थानातील पहिली ऑरल मिल, पहिली सॉ मिल, इलेक्ट्रीकल कंपनी, मोटार ट्रान्स्पोर्ट कंपनी असे उदयोग सुरु केले, त्याचबरोबर उत्तम प्रतीच्या गुळासाठी व विक्रीसाठी गुळाची बाजार पेठ निर्माण केली. निरनिराळया उदयोगासाठी प्रशिक्षीत कामगार तयार व्हावेत म्हणून, "राजाराम इंडस्ट्रीयल स्कूल" स्थापन करण्यात आले. हे सर्व उदयोग व्यवसाय निर्माण होण्याच्या आधीच महणजेच **1895** मध्येच रेल्वे स्टेशनजवळ शाहूपुरी या व्यापार पेठेची स्थापना महाराजांनी केली होती.

समाजाचा शैक्षणिक विकास होणे तितके महत्वाचे आहे तितकेच महत्व आर्थिक विकासालाही आहे. याची महाराजांना जाणीव होती. आर्थिक क्षेत्रात विकसित झालेला समाज स्वबळावर उभा राहू शकेल असा त्यांचा विश्वास होता. म्हणून शेती, शिक्षण व उदयोगधंदयांना त्यांनी प्रोत्साहन दिले असे दिसते.

**निष्कर्ष -**

**My dear Maharajasaheb,**

**We need you ever so much for you are the pillar of that great movement towards social democracy which is making its headway in India.**

**- Dr. B.r. Ambedkar**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या विषय अशा पध्दतीने आपले मत व्यक्त केले आहे यावरुनच महाराजांच्या कार्याची महती आपल्या लक्षात येते. त्यांनी शिक्षण, कृषी व उदयोग क्षेत्रातील कार्यामुळे आज जी कोल्हापूर संस्थानाची शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक प्रगती झाली आहे. त्याचे पायाभरणी महाराजांच्या या कार्यामुळे झाली आहे.

कृषी क्षेत्रात केलेल्या कार्यामुळे कोल्हापूर संस्थानातील कोरडवाहू बारमाही पाण्याखाली आली. शेतीवर अवलंबून असणारी लोकांचे जीवनमान उंचावले. त्यांच्या हातात पैसा आला. शेतीतून निर्माण होणा-या उत्पादनावर आधारित उदयोग व्यवसाय निर्माण झाले. लोकांना काम मिळाले. राधानगरी धरण क्षेत्रात **600** दशलक्ष घनफुट पाणी बारमास शेतीसाठी उपलब्ध झाले. यातून हरीत क्रांती झाली. शेतीवर आधारित दुय्यम व्यवसाय पण निर्माण झाले. चहाच्या शेतीतून दर्जेदार पन्हाळा नं. **4** निर्माण झला. मधुमक्षिकापालन व्यवसाय निर्माण झाला. हे आणि या सारखे अनेक बदल शेतीत महाराजांच्या योगदानामुळे झाले.

शिक्षण क्षेत्रातील योगदानातून कृष्णाबाई दुस-या परदेशात उच्च शिक्षण घेणा-या महिला ठरल्या. बहुजन समाजातील मुले शिकली. संस्थानातील एकूण विदयार्थ्यांची संख्या **10,844** इतकी होती. ती पुढील **10** वर्षात **27,830** इतकी झाली. त्याचबरोबर अस्पृश्य विदयार्थ्यांची संख्या **234** हून **2162** झाली. अस्पृश्य विदयार्थ्यांच्या संख्येत अशा प्रकारे नऊ पटीहून अधिक वाढ झाली. कॉलेज विदयार्थ्यांची संख्या पण वाढली.

उदयोग क्षेत्रात नविन नविन प्रयोग कोल्हापूर संस्थानात महाराजांनी राबविले. सहकार तत्वास कायदयाचे स्वरुप दिले. सहकारी संस्थाविषयक कायदा, दूध संकलन आणि सूत उत्पादन या तीन उदयोगांच्या सहकारी क्षेत्रात आज कोल्हापूर जिल्हा आघाडीवर आहे. सारांश, कोल्हापूर जिल्हयाने उदयोगधंदयाच्या व सहकाराच्या क्षेत्रात जी प्रगती केली आहे. तिचा पाया शाहू महाराजांच्या काळात कृषी-औदयोगिक-सहकार धोरणाने रचला गेला आहे. अशाप्रकारे थोडक्यात राजर्षि छत्रपती शाहू महाराजांचे कृषी शिक्षण आणि उद्योग मधील योगदान स्पष्ट करता येईल.

**संदर्भ** -

**1)** प्रा. पाटील, एन. डी., प्रा. थोरात डी. एस., प्रा. डॉ. पवार विश्वनाथ, प्रा. चिंदे एम.डी., भारतातील समाजसुधारणेचा इतिहास फडके प्रकाश, कोल्हापूर

डॉ. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू छत्रपती - जीवन कार्ये प्रकाशन - महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी

**2)** साळुंखे हिंदुराव - छत्रपती शाहू स्मृतिदर्शन प्रथमावृत्ती, कोल्हापूर

**3)** कोर धनंजय - राजर्षी शाहू छत्रपती

**4)** डॉ. पवार जयसिंगराव - शाहू गौरव ग्रंथ प्रकाशन महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी.